या जागेसाठी
जाहिरात
घेणे आहे

दैनिक
लोकक्रांतीचा आरंभ
# लोकआरंभ
LOK AARAMBH
dainiklokaarambh@gmail.com
संपादकः राहुल मारोतीराव वाईकर

प्रतिनिधी नेमणे आहे.
बीड आंबेजोगाई गेवराई वडवणी केज परळी पाटोदा शिरूर कासार धारूर आष्टी माजलगाव इच्छुकाने संपर्क साधावा
94036 41482

बीड/महाराष्ट्र वर्ष २ रे | शनिवार ८ जून २०२४ | अंक१८१ ● पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु

# काँगेसमुक्त भारत करण्याच्या फंदात अर्धा भारत भाजपमुक्त झाला , सामनातून मोदी- शाहांवर टीकास्त्र

**मोदी यांचा तोरा उतरला. मोदी यापुढे हिंदुत्वाचा हिसुद्धा तोंडातून काढू शकणार नाहीत, अशी टीका करण्यात आली आहे.**


## नऊ राज्यांतून भाजप हद्दपार

नरेंद्र मोदी 2014 साली प्रथम सत्तेवर आले तेव्हा 'काँग्रेसमुक्त भारता'चा नारा त्यांनी दिला. 2024 साली त्याच काँग्रेसने मोदींच्या गर्वाने फुगलेल्या छातीचा फुगा फोडला आहे. काँग्रेसने मुसंडी मारून भाजपच्या बहुमताचे मुंडके उडवले. किमान नऊ राज्यांतून भाजप हद्दपार झाला. भाजपला तेथे खाते उघडता आले नाही. तामीळनाडूसारख्या मोठ्या राज्यात भाजपला एकही जागा मिळाली नाही. पंजाब हे महत्त्वाचे राज्य आहे. या राज्यातही भाजप खाते उघडू शकला नाही. मेघालय, मणिपूर, नागालॅण्ड, सिक्कीम अशा सीमावर्ती राज्यांत भाजपची कामगिरी शून्य आहे. पुद्दुचेरी, चंदिगढमध्येही भाजप उरलेला नाही



लोकसभा निवडणूक 2024 चे निकाल लागले असून भाजपप्रणित एनडीए हे सरकार स्थापन करणार आहेत. उद्या ( 9 जून) संध्याकाळी नरेंद्र मोदी तिसऱ्यांदा पंतप्रधानपदाची शपथ घेतील. मात्र असे असले तरी भाजपला स्वबळावर सत्ता मिळाली नसून एनडीएतील इतर पक्षांच्या मदतीने हे सरकार चालणार आहे. याचाच दाखला देत शिवसेनेचे मुखपत्र असलेल्या 'सामना'तून मोदी-शाह जोडगोळीवर टीकास्त्र डागण्यात आले आहे. सत्ता स्थापनेसाठी बहुमताचा आकडा गाठताना मोदी-शहा यांची दमछाक झाली. मोदी यांचा तोरा उतरला. मोदी यापुढे हिंदुत्वाचा 'हि'सुद्धा तोंडातून काढू शकणार नाहीत, अशी टीका अग्रलेखात करण्यात आली आहे. सत्तेसाठी मोदी यांनी आधी पक्षफोडी केली, आता तडजोडी केल्या. कारण 'काँगेसमुक्त भारत' करण्याच्या फंदात अर्धा भारत 'भाजपमुक्त' झाला व मोदींचा तोरा कुबड्यांवर लटकला आहे, असा टोला लगावण्यात आला आहे. महाराष्ट्रातील भाजपवर तर मुंडण करून स्वतःचे श्राद्ध घालण्याची वेळ शिवसेना, काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेसने आणली. देशातील हे गणित पाहिले तर 'काँग्रेसमुक्त भारत' या नारेबाजीची साफ शकले उडाली आहेत. मोदी-शहांच्या गुजरातमध्ये काँग्रेसने खाते उघडले व अनेक मतदारसंघांत काँग्रेस उमेदवारांनी भाजप उमेदवारांना घाम फोडला. काँग्रेसचे योगदान मानायला मोदी तयार नव्हते. स्वातंत्र्यलढ्यात, देशाच्या प्रगतीत काँग्रेस कोठेच नाही असे मोदीकृत नव भाजपचे म्हणणे होते, पण या वेळी काँग्रेसने शंभर जागांचा टप्पा पार करून मोदी यांचा तर्क खोटा पाडला

## राज्यात पावसाने ठोठावले दार, मुंबई मान्सूनचे आगमन कधी ?



**बीड प्रतिनिधी**
केरळमधून मान्सूनने वाटचाल सुरू केली असून तो महाराष्ट्रात धडकला आहे. महाराष्ट्रात काही ठिकाणी पावसाचे आगमन झाले असून राज्यात पुढील पाच दिवसांमध्ये जोरदार पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागाकडून देण्यात आली आहे. येत्या 10 जून रोजी मान्सून महाराष्ट्रात दाखल होण्याची शक्यता हवामान खात्याने वर्तवली आहे. यंदा मान्सून वेळेच्या आधीच केरळमध्ये दाखल झाला असून तो आता भारताच्या इतर भागात पोहोचायला सुरुवात झाली आहे.

## धारुरचे ऐतीहासीक किल्ल्यात संशोधक टिम कडून सीडबॉलचे बिजारोपनचा उपक्रम

**धारूर प्रतिनिधी**
छत्रपती शिवाजी महाराजांच्या ३५० व्या राज्याभिषेक सोहळा दिनानिमीत्त छत्रपती शाहू महाराज संशोधन,प्रशिक्षण व मानव विकास संस्था सारथी पुणे च्या राज्यातील ऐतीहासीक किल्ल्यावर सारथी संशोधकाची टिम पाठवून या संशोधकानी तयार केलेले विवीध वृक्षाचे सीडबॉल लावण्या चा अभिनव उपक्रम राबविण्यात आला. धारूर येथील किल्ला व परीसरात १००० विवीध वृक्षाचे सीडबॉल रुजवण्यात आले या अभिनव उपक्रमाचे सर्वत्र कौतूक होत आहे.

छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण व मानव विकास संस्था, सारथी पुणे यांच्याकडून दि.




६ जून २०१४ रोजी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या ३५० व्या राज्याभिषेक सोहळ्या दिना निमित्त छत्रपती शिवाजी महाराज वनश्री आज्ञापत्र सारथी उपक्रम टिम नियुक्त करुन राज्यातील विवीध ऐतीहासीक किल्ल्यात राबविण्यात आला. त्या सोहळ्या निमित्त सारथी संशोधक टिमने किल्ले धारूर येथे ऐतीहासीक किल्ल्यात हा उपक्रम राबविला आहे. श्रीपाद कदम , परमेश्वर माने , रामेश्वर झोडगे , किशोर भगत या संशोधकानी विवीध वृक्षाची स्वत:तयार केलेले सीडबॉल जे कंडुलिंब, सुबाभुळ,आंबा, सिताफळ, एरंडी, बाभुळ, बोर, चंदन, चिंच या वृक्षाचे जे होते ते किल्ल्यात व परीसरात रुजवण्याचे उपक्रम राबविला पर्यावरणाचे रक्षण व सर्व परिसर हिरवागार करण्याचे मुळ उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला.या संशोधक टिमने पुर्ण किल्ल्ला पासून या उपक्रमाचा आनंद लुटला.

## बीडच्या माजलगाव तालुक्यातील हिवरा या गावांमध्ये वीज पडून बारा मेंढ्यांचा मृत्यू, मेंढपाळांच्या प्रश्नावर आक्रमक भूमिका मांडणाऱ्या सक्रिय नेत्या शारदा पाढरे यांची घटनास्थळी धावती भेट

**बीड प्रतिनिधी अंकुश गवळी**
बीडच्या माजलगाव तालुक्यातील हिवरा या गावांमध्ये रात्री अचानक झालेल्या वादळी वाऱ्याच्या विजेच्या कडाक्याने रामकिसन टकले या मेंढपाळांच्या तब्बल बारा मेंढ्या वीज पडून मृत्यू झाल्या आहेत ही घटना माजलगाव तालुक्यातील हिवरा या गावी घडले आहे, या मेंढपाळांचा तब्बल दोन लाखाचा मोठ्या प्रमाणात नुकसान झालेला आहे, तात्काळ पंचनामे करून या मेंढपाळाला आर्थिक मदत करण्यात यावी अशी मागणी होत आहे, सदरील पंचनामे करून मेंढपाळांना तात्काळ मदत करण्यात यावी अशी मागणी मेंढपाळांच्या प्रश्नावर आक्रमक भूमिका मांडणाऱ्या शारदा पांढरे यांनी केले आहे



## बंडू शेवाळे यांना मातृशोक



पाटोदा येथील सोनाली मेडीकल चे मालक उत्तम (बंडु शेठ) शेवाळे व तसेच सुभाष शेवाळे सर त्यांच्या मातोश्री कौशल्याबाई विश्वनाथ शेवाळे यांचे बुधवार सायंकाळी ५ वाजेच्या सुमारास अल्पशा आजाराने निधन झाले मृत्युच्या वेळी त्याचे वय ८३ वर्ष होते गुरुवारी सकाळी ९.३० वाजेच्या सुमारास शोकाकुल वातावरणात पाटोदा येथील स्मशानभूमीत त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले यावेळी मोठ्या संख्येने आप्तेष्ट नातेवाईक यांच्यासह पाटोदा शहर व तालुक्यातील सर्व क्षेत्रातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते त्यांच्या पश्चात बंडू शेवाळे व तसेच सुभाष शेवाळे सर अशी दोन मुले मुली नातवंडे असा मोठा परिवार आहे कौशल्याबाई या मनमिळाऊ स्वभावाचे होत्या त्यांचे निधनाने सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे




## पंकजा मुंडे यांच्या विषयी आक्षेपार्ह पोस्ट प्रकरणी आज शिरूर कासार बंद

**शिरूर कासार प्रतिनिधी**
माजी मंत्री तथा लोकसभेच्या भाजपा उमेदवार पंकजा मुंडे यांच्या विषयी आक्षेपार्ह पोस्ट प्रकरणी आज शिरूर कासार बंदचे आवाहन सकल ओबीसी आणि वंजारी समाजाच्या वतीने करण्यात आले आहे. पाथर्डी तालुक्यातील शिरापुर येथील महेश दत्तात्रय शिंदे आणि शिरूर कासार तालुक्यातील रायमोहा येथील योगेश तांबारे यांनी पंकजा मुंडे यांच्या विषयी आक्षेपार्ह पोस्ट कमेंट केल्यामुळे त्यांच्या विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात यावा.तसेच सदरील घटनेचा निषेध म्हणून शिरूर कासार शहर बंदचे आवाहन सकल ओबीसी आणि वंजारी समाज बांधवांनी केले आहे.या वेळी सहपोलीस निरीक्षक गणेश धोकरट यांना भाजपाचे ज्येष्ठ नेते दशरथ वनवे,प्रथम नगराध्यक्ष रोहिदास पाटील गाडेकर यांच्यासह तालुकाध्यक्ष सुरेश उगलमुगले,रामदास बडे,बाळू गर्जे,प्रकाश बडे,गणेश भांडेकर, बाळासाहेब केदार बबनराव ढाकणे केशव केदार डॉ.भगवान सानप, श्रीमंत सानप रामदास बारगजे, आसाराम माने धर्मराज जायभाये आरूण भालेराव प्रकाश खेडकरयांनी निवेदन दिले आहे.

## कविता

### मिरग

आला मिरग मिरग
सडा लिंबोळ्याचा रानी
राडा पाखरांचा चाले
झाड गाते गोड गाणी

आला मिरग मिरग
हाती डबोल कुंकाच
कुंकू लेवूनिया जाते
किडं काळ्या त्या पंखाच

आला मिरग मिरग
पेरणीची लगबग
मुठ सोडण्या धानाची
वाट चाले बिगबिग

आला मिरग मिरग
कण कण अंकुरला
थेंब थेंब जलाचा त्या
काळ्या मातीत मुरला

विद्या सरपाते

# बोगस बियाने विक्री करुन शेतकऱ्याची फसवणूक ; गुन्हा दाखल

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात गंगापूर येथे बोगस कापूस बियाणे विक्री करून शेतकऱ्यांची फसवणूक केल्याचा प्रकरणी चार जणा विरोधात गंगापूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्याच्याकडून लाखो रुपये किमतीचे बोगस कापूस बियाणे जप्त करण्यात आले आहे. पोलीसांकडून मिळालेल्या माहितीनुसार बोगस बियाणे मोहीम उपसंचालक,विभागीय कृषी सहसंचालक,छ. संभाजीनगर, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी व कृषी विकास अधिकारी यांचा मार्गदर्शनाखाली,तंत्र अधिकारी(गु.नि)विभागीय कृषी सहसंचालक काळूशे, तालुका कृषी अधिकारी बापुराव जायभाये व कृषी अधिकारी पंचायत समिती अजय गवळी यांच्या पथकाने गोपनीय माहितीच्या आधारे ६ जुन रोजी सिडवर्क्स इंटरनॅशनल प्रा.ली, गोडावली, मेडचाल-मलकाजगिरी,तेलंगना या कापुस बियाणे उत्पादक कंपनीचे क्षेत्रिय व्यवस्थापक (विक्री) अरुण नवनाथ कोळसे यांच्यासह लासुर नाका, गंगापूर येथील सुर्या इलेक्ट्रिनक्स, गंगापूर या दुकानासमोर संशयीत, बोगस व अनधिकृत कापूस बियाणे पुरवठा व विक्री करण्याच्या उद्देशाने आरोपी येणार असल्याचे खबऱ्या मार्फत माहीती मिळाली होती. या माहीतीनुसार पथकाने आकाश आप्पासाहेब सुकासे रा. संजरपुर ता. गंगापूर हा हद्युंदई कंपनीच्या आय१० या चारचाकी वाहन क्र. एमएच १४ बीसी ९१०४ या वाहनाने येवून (डमी ग्राहक) ऋतिक बाळासाहेब म्हसरुप रा. अगरवाडगाव ता. गंगापूर यांना संशयीत, बोगस व अनधिकृत कापुस बियाणेचे २ पाकीटे विक्री करीत असतांना पंचासमक्ष पकडण्यात आले. सदर कापुस बियाणेच्या पाकीटांची पाहणी केली असता कंपनी प्रतिनिधी अरुण कोळसे यांनी पाकीटे आमच्या कंपनीचे नसुन व बोगस असल्याचे सर्वासमक्ष सागितले. बोगस आढळुन आलेले बिटी कापुस बियाणे पाकीटे विक्री करणारा आकाश आ प्पा सा हे ब सुकाशे रा. संजरपुर ता.गंगापूर यांना चौकशी केली असता सापडलेली पाकीटे गंगापूर शहरातील सदगुरु ॲग्रो ॲन्ड मशीनरी भुषण रामेश्वर पाटील या दुकानातुन आ ण ल्या चे स गि त ले. अ स ता सर्व पंचलोक मे. सदगुरु ॲग्रो ॲन्ड मशीनरी या दुकानात जावून पाहणी केली व चौकशी केली असता दुकानदार भुषण रामेश्वर पाटील व आरोपी विक्रेता आकाश आ प्पा सा हे ब सुकाशे या दोघांनी उडवाउडवीचे उत्तरे दिले मात्र पथकाने पोलीसांना बोलावून घेतले असता पोलीसांनी खाक्या दाखवताच अरोपींनी में पाटील इलेक्ट्रीकल्स ॲन्ड इलेक्ट्रिनक्स,गंगापूर यांच्या दुकानामध्ये कापुस बियाणेचे पाकीटे ठेवल्याचे कबुल केल्याने दुकानाची झडती घेतली असता एका गोणीमध्ये बिटी एस डब्ल्यु सी एच ४७४९ सुपर व युएस ७०६७ कंपनीचे बिटी कापूस पाकीटे संशयीत, बोगस व अनधिकृत कापुस बियाणे विक्रीच्या उद्येशाने लपवुन ठेवलेले आढळुन आले. सदर पाकीटांची पंच वअधिकारी यांच्या समक्ष सिडवर्कस इंटरनॅशनल प्रा. ली, तेलंगाना कंपनी प्रतिनिधी अरुण कोळसे यांनी ही पाकीटे आमच्या कंपनीचे नसुन बोगस व अनधिकृत असल्याचे सांगितले. या प्रकरणी पोलीस कर्मचारी यांनी पुढील चौकशी केली असता विक्रेता आकाश आप्पासाहेब सुकाशे रा.संजरपूर यांनी लासुर स्टेशन येथील मे. अंबिका कृषि सेवा केंद्र, लासुर स्टेशन ता. गंगापूर येथून पवन सोपान बोरकर यांचे कडुन आणल्याचे कबुल केले व त्यांना या बोगस बियाणेची विक्री करणाऱ्या सर्व व्यक्तींची माहीती असल्याचे सांगितले. तसेच वरील 32 नग बोगस व अनधिकृत कापुस बियाण्याचे पाकीटे गंगापूर पोलिस ठाण्यात जमा करण्यात आले असून कृषी अधिकारी पंचायत समिती अजय गवळी यांच्या फिर्यादीवरून विविध २४ कलमान्वये चार आरोपी विरोधात बनावट कापूस बियाण्याची विक्री तसेच फसवणूक केल्या प्रकरणी गंगापूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलीस करत आहे..


## नविदा

चायत काय नाळवंडी
**जिल्हा परिषद बीड ग्रामपंचायत कार्यालय नाळवंडी ता.जि. बीड.**

ग्रामपंचायत कार्यालय नाळवंडी ता.जि. बीड. यांच्या वतीने खालील कामासाठी ग्रामपंचायतीला योग्य त्या एजन्सीज/कंत्राटदारकडून विहित नमुन्यात निविदा मागविण्यात येत आहेत. कंत्राटदार यांनी दिनांक 08/06/2024 वेळ सकाळी ११:०० वाजेपासून निविदा भराव्यात. **सविस्तर माहिती ग्रामपंचायत नोटीस बोर्ड व ग्रामपंचायत कार्यालयात दिनांक ०८/०६/२०२४ वेळ सकाळी ११:०० वाजेपासून ते दिनांक १४/०६/२०२४ रोजी सायंकाळी** ०५:०० वाजेपर्यंत पाहता/भरता येईल.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजित किमंत (रुपये) | कोरी निविदा किमंत | बयाना रक्कम | काम पूर्ण करण्याचा कालावधी | कंत्राटदार वर्गवारी |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | १ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | **१५ वित्त आयोगाच्या निधीमधील ग्रा.पं. नाळवंडी अंतर्गत चे काम - EXCAVATION / DESILTING OF EXISTING DRAIN.** | **१,६१,४००/-** | **२,00/-** | **१,६१४/-** | ३ महिने | अनुभवी कंत्राटदार |

**सूचना :-**
**१) सर्व पात्र इच्छुक कंत्राटदार नोदणीकृत असणे अनिवार्य आहे.**
**२) निविदेतील 1 नमुन्यातील सर्व अटी कंत्राटदाराला बंधनकारक राहतील.**
**३) सदरील काम करताना कोणत्याही प्रकारचा अग्रिम दिला जाणार नाही.**
**४) सर्व साहित्यकामाचे स्थळावर कंत्राटदाराने स्वता उपलब्ध करून काम करणे आवश्यक आहे.**
**५) निविदेतील अटी व शर्तीत बदल करण्याचा व तसेच कोणतेही कारण न देता निविदा स्वीकारण्याचा अथवा रद्द करण्याचा सरपंच / ग्रामविकास अधिकारी ग्रामपंचायत कार्यालय नाळवंडी, ता.जि. बीड यांनी राखून ठेवलेला आहे.**
**६) निविदा उघडण्याची वेळ // सायंकाळी ११:०० वाजता ग्रामपंचायत कार्यालय नाळवंडी ता.जि. बीड.**

ग्रामविकास अधिकारी
ग्रामपंचायत कार्यालय, नाळवंडी
**ग्रामविकास अधिकारी सरपंच**
**ग्रामपंचायत कार्यालय नाळवंडी, ता.जि. बीड**


# विद्यार्थ्यांनी निरंतर संघर्ष करत रहावे--महेश वडदकर

**नांदेड प्रतिनिधी**
**बालाजी सिरसाट**

नांदेड : छत्रपती शिवाजी महाराज यांच्या साडेतीनशे व्या राज्याभिषेक सोहळ्यानिमित्त यशवंतराव चव्हाण मराठा वसतिगृह येथे शिवराज्याभिषेक दिनानिमित्त वसतिगृहात राहणाऱ्या मुलांसाठी अभ्यासिका केंद्राचे उद्घाटन करण्यात आले अभ्यासासाठी एकाग्रता महत्वाची आहे ती या अभ्यासिकेतुन पुर्ण होईल तसेच विद्यार्थ्यांनी सतत संघर्ष करत रहावा प्रतिभा आपोआप वाढती राहील असं मत अभ्यासिका उद्घाटन प्रसंगी नांदेड जिल्हा निवासी जिल्हाधिकारी महेश वडदकर यांनी मत व्यक्त केले.

छत्रपती शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक होवुन साडेतीनशे वर्षे पुर्ण झाली हा राज्याभिषेक सोहळा महाराष्ट्रातच नाही तर जगभरात साजरा करण्यात आला मराठा सेवा संघाचे संस्थापक अध्यक्ष इंजि पुरूषोत्तम खेडेकर यांनी वेगवेगळ्या समाजउपयोगी कार्याने हा दिवस साजरा करावा असे आवाहन केले होते त्याचप्रमाणे गत तीस वर्षापासुन नवा मोंढा नांदेड येथे चालु असलेल्या यशवंतराव चव्हाण मराठा वसतिगृह येथे वसतिगृहातील मुलांना अभ्यासिकेची अत्यंत गरज होती ती गरज शिवराज्याभिषेक दिनाचे औचित्य साधुन पुर्ण करण्यात आली.मधुकर देशमुख हे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उपस्थित होते निवासी जिल्हाधिकारी महेश वडदकर हे उद्घाटक म्हणुन उपस्थित होते.मराठा सेवा संघाचे राष्ट्रीय अध्यक्ष कामाजी पवार, मराठा सेवा संघाचे केंद्रीय सहसचिव पंजाब चव्हाण,मराठा सेवा संघाचे विभागीय अध्यक्ष इंजि.शे.रा.पाटील, प्रसिद्ध स्त्रीरोगतज्ज्ञ डॉ गायत्री वाडेकर, रामराव चौरे,प्रा.संतोष देवराये,इंजि.तानाजी हुस्सेकर हे प्रमुख पाहुणे उपस्थित होते. यशवंतराव चव्हाण मराठा वसतिगृहात शिकुन विविध क्षेत्रात कार्यरत माजी विद्यार्थीही यावेळी उपस्थित होते आणि त्यांनी अभ्यासिकेसाठी स्वतःहुन देणगीही यावेळी दिली.भुतकाळ हा भविष्याचा बोध घेण्यासाठी असावा विद्यार्थ्यांनी आपल्या सोबत शिकणाऱ्या मित्रांमधील चांगले गुण शिकावेत शिकुन चांगल्या पदावर गेल्यावर त्या पदाचा पुरेपुर वापर समाजातील विविध घटकांतील लोकांचे काम करण्यासाठी मिशिनरी वृत्तीने करावा असेही मत यावेळी वडदकर यांनी मांडले.

आईवडिलापेक्षा कितीतरी चांगल्या पद्धतीने मला या वसतिगृहाने घडवले वसतिगृह नसत तर मी घडल नसतो तुम्ही जे पेरले ते आमच्या मार्फत उगवत आहे या वसतिगृहाला आम्ही पाच हजार, अकरा हजार मदत देत आहोत असे मत यावेळी वसतिगृहाचा माजी विद्यार्थी ॲड दिगंबर देशमुख याने मांडले. या वसतिगृहातुन अनेक मुलाचे भवितव्य घडले आहे.आजही माझ्या गावातील घर पत्र्याचे आहे माझ्यासारख्या अनेकांना आधार या मराठा सेवा संघाच्या वसतिगृहातुन मिळला आज मी इथे शिकुन वर्धा पोलिस येथे कार्यरत आहे वर्धा पोलिस भरतीत जिल्ह्यात पहिला आलो होतो असे यावेळी दत्ता मोरे या विद्यार्थ्यांने मनोगत मत प्रा संतोष देवराये यांनी व्यक्त केले. मराठा सेवा संघाने नांदेडच्या वसतिगृहाची




व्यक्त केले.अनेक मोठमोठ्या शहरात मुला मुलींना शिक्षणासाठी चांगल्या सुविधा भेटत नाहीत मात्र मराठा सेवा संघाच्या वतीने चालु असलेल्या वसतिगृहात सोयी सुविधा या वाखाणण्याजोग्या आहेत असे मत प्रसिद्ध स्त्रीरोगतज्ज्ञ डॉ गायत्री वाडेकर यांनी व्यक्त केले.जोपर्यंत ध्येय प्राप्त होत नाही तोपर्यंत मोबाईल पासुन दुर विद्यार्थ्यांनी राहीले पाहिजे मोबाईलमुळे एकागृता कमी होते. एकाग्रतेने या अभ्यासिकेत अभ्यास करावा शिवराज्याभिषेक हा मध्ययुगीन भारताच्या इतिहासातील अत्यंत महत्वाचा क्षण आहे मराठी भाषेला राजभाषेचा दर्जा शिवाजी महाराजांनी दिला असे संकल्पना भारतात नेली. शिवाजी महाराजांनी स्वातंत्र्य समता बंधुता ही मुल्य दिली,शेतकर्यांच्या तसेच बहुजनांच्या हिताचे शिवाजी महाराज होते म्हणुन शिवाजी महाराजांचा आज साडेतीनशे वर्षानंतरही राज्याभिषेक सोहळा होतो असे मत मराठा सेवा संघाचे राष्ट्रीय अध्यक्ष कामाजी पवार यांनी व्यक्त केले.वसतिगृह चालवत असतांना अनेक कडु गोड अनुभव आम्हाला आले पण आम्ही खचलो नाही सातत्यपुर्ण आणि पारदर्शक काम वसतिगृह चालु करण्यासाठी आणि चालविण्यासाठी केले असे मत यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उपस्थित असलेल्या यशवंतराव चव्हाण मराठा वसतिगृहाचे अध्यक्ष मधुकर देशमुख यांनी व्यक्त केले. मुलिंच्या वसतिगृहातील धनश्री पाटील या मुलीने नीट मध्ये सातशे वीस पैकी सहाशे एकसष्ठ गुण घेतले त्यामुळे तीचे यावेळी मान्यवरांच्या हस्ते कौतुक करण्यात आले. प्रारंभी राष्ट्रमाता जिजाऊ, छत्रपती शिवाजी महाराज यांचा प्रतिमेचे पुजन करण्यात आले सामुहिक जिजाऊ वंदना घेण्यात आली.प्रास्ताविक मराठा सेवा संघाचे जिल्हाध्यक्ष उद्धव सुर्यवंशी यानी केले आभार मराठा सेवा संघाचे जिल्हाध्यक्ष नानाराव कल्याणकर यांनी मांडले तर सुत्रसंचलन मराठा सेवा संघाचे जिल्हा सचिव रमेश पवार यांनी केले.यावेळी मराठा सेवा संघ कृषी परिषदेचे राष्ट्रीय अध्यक्ष सोपानमामा क्षिरसागर,मराठा सेवा संघाचे जिल्हाध्यक्ष उद्धव सुर्यवंशी, मराठा सेवा संघाचे जिल्हाध्यक्ष नानाराव कल्याणकर, जिजाऊ ब्रिगेड च्या विभागीय अध्यक्ष डॉ विद्या पाटील, संभाजी ब्रिगेड विभागीय अध्यक्ष संकेत पाटील, रमेश पवार, सतीश जाधव, संभाजी ब्रिगेड जिल्हाध्यक्ष सुभाष कोल्हे, संभाजी ब्रिगेड जिल्हाध्यक्ष परमेश्वर पाटील,न्याय दान कक्षाचे अध्यक्ष संतोष इंगोले,जिजाऊ ब्रिगेड जिल्हाध्यक्ष सुमित्रा वडजकर, जिजाऊ ब्रिगेड जिल्हाध्यक्ष कल्पना चव्हाण,अरुणा जाधव,पि.के.कदम, संजय हंबर्डे,जनार्धन कदम, बळिराम फाजगे, प्रल्हाद कर्हाळे, मुरलीधर हंबर्डे,शिवहारी गाढे,आजय मुंगल, राधाकृष्ण होगे, संगमेश्वर लांडगे,इंजि.प्रवीण जाधव यांच्या सह अनेकांची उपस्थिती होती

# वेरूळ येथे ३५० वा शिवराज्याभिषेक सोहळा मोठ्या उत्साहात १२५जोडप्यांच्या हस्ते करण्यात आला शिवाभिषेक



छत्रपती शिवाजी महाराज यांच्या रायगडावर झालेल्या शिवराज्याभिषेक सोहळ्याला आज साडेतीनशे वर्षे पूर्ण झाले त्यानिमित्त वेरूळ येथील मालोजीराजे भोसले गडीवर शिवराज्याभिषेक दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला यावेळी १२५पती-पत्नी जोडप्यांच्या हस्ते महाराजांना ब्रह्म वृंदाच्या मंत्रघोषात सामूहिक महाशिव अभिषेक करण्यात आला मोठ्या संख्येने शिवभक्त उपस्थित होते वेरूळ येथील पवित्र भूमीमध्ये स्वराज्य संकल्पक शहाजीराजे महाराज आणि स्वराज्य प्रेरिका मां साहेब जिजाऊ यांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या श्रीक्षेत्र वेरूळ भूमी मध्ये शहाजीराजे स्मारक मालोजीराजे भोसले गडी येथे ३५० व्या शिवराज्याभिषेक दिन सोहळ्याचे आयोजन स्वराज्य संकल्पक शहाजीराजे भोसले प्रतिष्ठानचे अध्यक्ष राजेंद्र पवार व वेरूळ ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आले होते ब्रह्मवृंदाच्या मंत्रघोषात मान्यवरांच्या हस्ते सामूहिक शिव अभिषेक करण्यात यावेळी आयोजक समितीचे सदस्य राजू चव्हाण, मनोहर गावडे,कडूबा सोस्टे ,भिकन अल्लाट,अरुण अधाने, गणपत म्हस्के,यासह विविध क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते सोहळ्यासाठी सप्त नद्यांचे पाणी विशेष म्हणजे या ऐतिहासिक अभिषेक सोहळ्यात दरम्यान कोल्हापूर वरून खास मागविण्यात आलेल्या छत्रपती शिवरायांच्या १२५ मूर्तींना मान्यवरांच्या हस्ते अभिषेक करण्यात आला त्यानंतर या मूर्ती सोहळ्यासाठी उपस्थित मान्यवरांना विशेष भेट म्हणून देण्यात आल्या अभिषेकासाठी गंगा, यमुना, सरस्वती, कावेरी, कृष्णा, गोदावरी, नर्मदा, या सात पवित्र नद्यांची जल वापरण्यात आले



डोंबिवली(प्रतिनिधी-गुरुनाथ तिरपणकर)-म्युझिक मंत्रा च्या ऑर्गनाझर शर्मिला केसरकर यांचा सुरेल आवाज,गाण्याची आवड,उत्तम सादरीकरण,सर्वांना बरोबर घेऊन काम करण्याची जिद्द अशा या कुटुंब प्रमुख आहेत.

# श्री क्षेत्र चाकरवाडी कडे जाणाऱ्या रस्त्याची दुरावस्था..आमदार ताई निवडणूक जवळ आली की आश्वासन देणार की काय ? – अभिजीत पवार

**बॅनरबाजी केलेले एक वर्ष झालं कुठे झाला रस्ता दाखवा ताई साहेब...! स्थानिक प्रशासनाने लक्ष देऊन पुण्यतिथी उत्सवा अगोदर रस्ता दुरुस्त करून घ्यावा..**

बीड प्रतिनिधी - महाराष्ट्रातील धाकटी पंढरी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या श्रीक्षेत्र चाकरवाडी कडे जाणाऱ्या रस्त्याची दुरावस्था झाली आहे. प्रत्येक अमावस्या निमित्त श्रीक्षेत्र चाकरवाडी या ठिकाणी हजारो भाविक भक्त येत असतात. येत्या 14 जून पासून विसाव्या शतकातील माणसांचा विभूती संत श्री न्यानेश्वर माऊली महाराज यांची 24 वी पुण्यतिथी उत्सव सुरू होत आहे. या पुण्यतिथी उत्सवानिमित्त महाराष्ट्रातून वेगवेगळ्या ठिकाणाहून लाखो भावी भक्त दर्शनासाठी येणार आहेत पावसाळ्याचे दिवस असल्यामुळे खड्ड्यामध्ये पाणी साचते. या पावसाळ्याच्या दिवसांमध्ये भावी भक्तांना त्रास सहन करावा लागत आहे. केज विधानसभा मतदारसंघ अंतर्गत श्री क्षेत्र चाकरवाडी गाव येत आहे या गावांमध्ये प्रत्येक धार्मिक कार्यक्रमांमध्ये केज विधानसभेत मतदारसंघाचे आमदार नमिता मुंदडा यांचे सासरे नंदकिशोर काका येत असतात परंतु त्यांना चाकरवाडी येथे जाणारा रस्ता दिसत नाही काय ? यावर प्रश्नचिन्ह निर्माण होत आहे. दिवसाढवळ्या या रस्त्यांवरुन प्रवास करतांना येणाऱ्या- जाणाऱ्या भाविक भक्तांना तसेच नागरिकांना आपला जीव मुठीत धरुन प्रवास करावा लागतोय. आमदार, खासदार आणि अधिकारी ये- जा करतात. परंतु



त्यांना या रस्त्यांची दुर्दशा दिसत नाहीत काय? असा प्रश्न नागरिकांमध्ये उपस्थित होत असतो. ऐन पावसाळ्यात रस्त्यावर खड्डे पडल्याने वाहन धारकांना प्रचंड अशा त्रासाला सामोरे जावे लागत आहे. पावसाचे पाणी रस्त्यावरील खड्यात साचल्याने या खड्यांचा वाहन धारकाना अंदाज येत नाही. त्यामुळे गाड्या खड्ड्यात आदळल्या जात आहेत. त्यामुळे अपघात होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. वा काय रस्ता, काय खड्डे अन् खड्यात पाणी, निवडणूक जवळ आली की नुसतं आश्वासन देऊन मोकळे होतात, केज विधानसभा मतदारसंघाच्या आमदार नमिता मुंदडा या फक्त बॅनरबाजी करण्यात दंग आहेत. त्यांना ज्ञानेश्वर माऊली महाराज यांच्या समाधी स्थळाकडे जाणारा रस्ता दिसत नाही की काय यावर प्रश्नचिन्ह निर्माण होत आहे. राजकीय लोक असाच सध्या नागरिकांमधून सवाल उपस्थित केला जात आहे. रस्त्यामध्ये पडलेल्या खड्डयांचा स्थानिक रहिवाशांना तसेच श्री क्षेत्र चाकरवाडी कडे येणाऱ्या भावी भक्तांना त्रास सहन करावा लागत आहे. परिसरात झालेल्या पावसाने जवळपास सर्वच रस्त्यांची मोठ्या प्रमाणात दुरावस्था झाली आहे. तरी लवकरात लवकर चाकरवाडी कडे जाणारा रस्ता दुरुस्त करावा अशी मागणी स्थानिक नागरिकांनी तसेच रिक्षा चालकांनी यावेळी केली आहे.

# शौर्य सन्मानचिन्ह विजेते माजी सहाय्यक पोलीस आयुक्त एकनाथ खोल्लम यांच्या "वर्दी" पुस्तकाचा प्रकाशन सोहळा संपन्न

इनोव्हेटिव्ह मानबिंदू प्रकाशन तर्फे शौर्य सन्मानचिन्ह विजेते माजी सहाय्यक पोलिस आयुक्त एकनाथ खोल्लम यांच्या "वर्दी" पुस्तकाचा प्रकाशन सोहळा नुकताच पत्रकार भवन येथे मोठ्या थाटात संपन्न झाला.

प्रमुख अतिथी जेष्ठ अभिनेत्री नैना आपटे यांच्या शुभहस्ते "वर्दी" पुस्तकाचे प्रकाशन झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ तथा साहित्यिक डॉ.लक्ष्मण शिवणेकर होते, गप्पा गोष्टीकार जंयत ओक, आंतरराष्ट्रीय प्रेरणादायी वक्ते डॉ.रत्नाकर अहिरे , माजी वरिष्ठ पोलीस निरीक्षक जवानसिंग गौड व जनसेवक सुरज भोईर प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित. वर्दी पुस्तकाचे लेखक एकनाथ खोल्लम व सौ.निर्मला खोल्लम हे सुद्धा मंचकावर उपस्थित होते.सदरहु सोहळ्याची संकल्पना, आयोजन व नियोजन एन.डी.खान आणि सौ.सलमा खान यांनी केले होते.

यावेळी एकनाथ खोल्लम यांच्या वर तयार करण्यात आलेली टी.एम. जी क्रियेशन्स निर्मित " वर्दीतील हळव्या मनाचा माणूस" एकनाथ माधव खोल्लम चित्रफित दाखविण्यात आली.

# पाचवीला शिवचरित्र आणि शस्त्र पूजन करुन मुलांचे जन्माचे स्वागत.. बादाडे परिवाराचा मराठा बहूजन समाजाला एक नवीन आदर्श..

**बीड प्रतिनिधी अंकुश गवळी** आपल्या महाराष्ट्राला एक वैचारिक वारसा आहे. याच मातीत अनेक संत महापुरुष होऊन गेले त्यांनी समाजासाठी अनेक आदर्श विचार दिले. याचाच प्रत्यय म्हणजे पुण्यातील समिक्षा संतोष बादाडे यांना मुलगा झाल्यानंतर त्यांच्या जन्माचे स्वागत, मुलांच्या पाचवीच्या कार्यक्रमात कोणतेही कर्मकांड न करता, जगद्गुरू तुकोबाराय राजमाता जिजाऊ छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमाचे पूजन करून तसेच शिवचरित्र व शस्त्र पूजन करण्यात आले. जर तुम्हांला स्वतः ची भावी पिढी उत्कृष्ट शिक्षित,



विज्ञाननिष्ठ परिवर्तनवादी वैचारिक विचारांची व्हावी असे वाटत असेल तर तुम्हांला स्वतःच्या घरात अंधश्रध्दा, कर्मकांड यावर मात करून विज्ञानवादी विचार समाजात रुजवण्याचे काम नवीन पिढीला करावे लागेल.. ०३ जून २०२४ सोमवारी या दिवशी मुलांचा जन्म झाला आणि ०७ जूनला पाचवी पूजन असल्यामुळे घरी जिजाऊ वंदना घेऊन शस्त्र व शिवचरित्राचे पूजन केले आणि बाळाचे नामकर केले, शंभू हे नाव ठेवले. बादाडे पाटील परीवार हा तुकोबाराय शिव फुले शाहू आंबेडकर आण्णाभाऊ आणि शहिद भगतसिंग विचारांचा आहे. बादाडे परिवार हा विचार आणि कृतीचा सांगड घालणारा वैचारिक विचारांचा आहे. जर समाज परिवर्तन घडवायचे असेल तर स्वतःच्या घरापासून सुरूवात करायला पाहिजे. म्हणून हा उपक्रम नक्कीच येणाऱ्या पिढीला नवीन दिशा देण्याचे काम करेल. समाजात विचार उगवण्याची चिंता करण्यापेक्षा पेरणीला सुरूवात करा, एक दिवस तुमच्या वैचारिक विचारांच्या शेतात उगवलेल धान्य लोक पेरण्यासाठी नक्कीच घेऊन जातील. हाच विचार घेऊन बादाडे कुटूंब पुढे जात आहे. आणि मराठा बहूजन समाजाला एक नवीन आदर्श घालून देण्याचे काम बादाडे परीवाराकडून घडत आहे. त्यांच्या या उपक्रमाचे महाराष्ट्रभरातून कौतूक होत आहे..

# दुष्काळ जाहीर करुनही २०२३ चा खरीप पिकविमा मिळाला नाही, पिक कर्ज माफ केले नाही तसेच पिक कर्जाचे पुर्नरगठनही केले नाही तर शेतकरी २०२४ च्या खरीपाची पेरणी कशी करणार.:-भाई विष्णुपंत घोलप

**बीड प्रतिनिधी**

पाटोदा(प्रतिनिधी) सन २०२३ च्या खरीप हंगामात पावसाच्या खंडामुळे खरीप पिक जवळपास ८०% वाया गेली. शासनाने त्यावेळेस दुष्काळ जाहीर केला जी काही पिके आली ती काढणी आणि पेरणीला सुध्दा पुरली नाही. आज पावसाळ्याला सुरुवात झाली आहे. शेतकरी आर्थिक संकटात आहे. शेतकऱ्यांचा गेल्यावर्षीचा म्हणजे २०२३ चा खरीप पिकविमा किमान ८०% तरी शेतकऱ्यांना तात्काळ मिळाला पाहिजे तसेच पिक कर्जाचे नवे जुने करुन शेतकऱ्यांच्या पदरात काही सुध्दा पडत नाही.१०% पिककर्ज वाढुन म्हणजे बँकेला व्याजाची भरती करण्यासाठी मार्ग काढला आहे. मा.जिल्हाधिकारी साहेबांनी शेतकऱ्यांना तात्काळ नवीन पिक कर्ज वाटप करण्यासाठी बँकांना आदेश द्यावेत आणि विमा कंपनीला सुचना देऊन २०२३ चा खरीप पिक विमा किमान सन २०२४ च्या खरीप पेरणीसाठी तरी तात्काळ द्यावा नसता शेतकऱ्यांचा मोठा उद्रेक होईल. शेतकरी खुप मोठ्या आर्थिक संकटात असल्यामुळे त्याला तात्काळ खरीप पेरणीसाठी मागील पिकविमा आणि नवीन पिककर्ज कोणताही विलंब न करता तात्काळ मिळावे. या अगोदर भारतीय शेतकरी कामगार पक्षाच्या वतीने राज्याचे कृषीमंत्री तथा पालकमंत्री मुंडे साहेब आणि जिल्हाधिकारी,बीड यांना लेखी निवेदनाव्दारे वरील मागणी केलेली आहे. लोकसभा निवडणुकीमुळे वरील विषयाला जरी विलंब झाला असेल तरी आता केंद्रीय निवडणुक आयोगाने आचारसंहिता उठविली आहे. राज्याचे कृषिमंत्री तथा पालकमंत्री आपल्या बीड जिल्ह्यातील असल्यामुळे वरील विषयाला गंभीरतेने घेऊन शेतकऱ्यांना तात्काळ आर्थिक संकटातुन



बाहेर काढण्याचा मार्ग मोकळा करावा असे लेखी निवेदनाव्दारे भारतीय शेतकरी कामगार पक्षाचे बीड जिल्हा चिटणीस भाई विष्णुपंत घोलप यांनी मा.उपविभागीय अधिकारी कार्यालय,पाटोदा यांच्या मार्फत मा.जिल्हाधिकारी साहेब,बीड तसेच माहितीस्तव राज्याचे कृषी मंत्री तथा बीड जिल्हा पालकमंत्री मुंडे साहेब व शेकापचे सरचिटणीस आ.भाई जयंत पाटील आणि बीड जिल्ह्याचे खासदार मा.बजरंग(बप्पा) सोनवणे यांना दिले आहे.

# बोरद गटात महाविकास आघाडीने मारली मुसंडी.- ॲड.गोवाल पाडवी यांना सर्वाधिक मते.

**प्रतिनिधी/तळोदा**

लोकसभा निवडणूक २०२४ च्या नंदुरबार लोकसभा मतदारसंघातून महाविकास आघाडीचे उमेदवार ॲड.गोवाल पाडवी यांनी माजी खासदार डॉ. हिना गावित यांना १ लाख ५९ हजार १२० मतांची आघाडी घेत पराभूत केले आहे.यामध्ये बोरद परिसरात देखील महाविकास आघाडीने लोकसभा निवडणुकीच्या निमित्ताने मोठी आघाडी घेतल्याचे दिसून येत आहे.

गेल्या वर्षी झालेल्या ग्रामपंचायत निवडणुकीमध्ये बोरद परिसरातील सिंगसपूर(तुळाजा) वगळता सर्व ठिकाणी भाजपाने सत्ता प्रस्थापित केली होती. या परिसरातील सिंगसपूर(तुळाजा) वगळता प्रत्येक गावात भाजपाचे सरपंच विराजमान झाले त्याचबरोबर बोरद परिसरातील मोठे गाव म्हणून ओळखले जाणारे सिंगसपूर (तुळाजा) या ठिकाणी एकमेव कॉंग्रेसचे सरपंच विराजमान झाले. त्याचबरोबर बोरद गटात देखील सिंगसपूर (तुळाजा) या गावाचेच भाजपाचे जि.प. सदस्या ही निवडून आल्या आहेत.

अशा परिस्थितीत बोरद गटात देखील गोवाल पाडवी यांनी मोठी मुसंडी मारल्याचे चित्र सध्या दिसून येत आहे.

बोरद गटातील गावांमध्ये ॲड.गोवाल पाडवी यांना ८६५९ मते मिळाली आहेत तर हिना गावित यांना ४८५८ मत मिळाली आहेत. बोरद गटात ॲड. गोवाल पाडवी यांनी ३७९१ मतांची आघाडी घेतली आहे. त्यामुळे भाजपाचा गड म्हणून ओळखल्या जाणाऱ्या बोरद परिसरात देखील महाविकास आघाडीने मुसंडी मारल्याने कॉंग्रेस पक्षाला नवसंजीवनी या ठिकाणी प्राप्त झाली आहे.त्यामुळे पुढे येऊ घातलेल्या विधानसभा निवडणुकीत भाजपासाठी ही धोक्याची घंटा आहे.त्यामुळे परिसरातील भाजपा पदाधिकाऱ्यांना व कार्यकर्त्यांना आत्मपरीक्षण करावे लागणार आहे.

बोरद गटातील मतदानाचा आढावा घेतला असता.

बोरद -:
ॲड.गोवाल पाडवी -: १६७८ मते
डॉ.हिना गावित -: १६८६ मते.
मोहिदा.ॲड.गोवाल पाडवी -: ६८२
मतेडॉ.हिना गावित -: ५५६ मते.
मोड.ॲड.गोवाल पाडवी -: १७२८ मते
डॉ.हिना गावित -: ८५६ मते.

## कॉंग्रेस कार्यकर्त्यांना लाभली नवसंजीवनी.

मालदा.ॲड.गोवाल पाडवी -: ७६० मतेडॉ.हिना गावित -: २२० मते. सिंगसपूर(तुळजा).ॲड.गोवाल पाडवी -: १०१९ मतेडॉ.हिना गावित -: ४४७ मते.करडे.ॲड.गोवाल पाडवी -: ८९० मतेडॉ.हिना गावित -: २६६ मते. गोंडाळे.ॲड.गोवाल पाडवी -: १९५ मतेडॉ.हिना गावित -: २४८ मते. लाखपूर (फॉ.)ॲड.गोवाल पाडवी -: १२५३ मतेडॉ.हिना गावित -: ५०५ मते.जुवानी(फॉ).ॲड.गोवाल पाडवी -: ४४४मते डॉ.हिना गावित -: ७४ मते.संविधान बदल याबाबतचा प्रचार तसेच राहुल गांधी यांनी महिलांसाठी जाहीर केलेल्या प्रतिमाह ८००० रुपये देण्याची घोषणा,त्याचबरोबर समान नागरिक कायद्यानुसार आरक्षण हटविले जाणार असल्याचा प्रचार यामुळे यामुळे मतदार भाजपाऐवजी कॉंग्रेस कडे वळाल्याचे चित्र प्रसारात सर्वत्र आहे.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ

# लोकआरंभ

या जागेसाठी जाहिरात घेणे आहे



# तीन हजारांची लाच घेताना खा. रजनीताई पाटील यांच्या शाळेतील मुख्याध्यापक जेरबंद

## माजी मंत्री अशोकराव पाटील यांच्या शाळेतील भ्रष्टाचाराचा कारभार चव्हाट्यावर

**केज /प्रतिनिधि**

दाखल्याची दुय्यम प्रत देण्यासाठी तीन हजारांची लाच स्वीकारताना एक शाळेच्या मुख्याध्यापकास बीड एसीबीने रंगेहाथ पकडल्याने खळबळ उडाली आहे. केज तालुक्यातील खासदार रजनीताई पाटील यांच्या संस्थेतील सोनवणे नामक मुख्याध्यापकाने विद्यार्थ्याकडे दाखल्याची दुय्यम प्रत देण्यासाठी





तीन हजार रुपयांच्या लाचेची मागणी केली होती. याबाबत विद्यार्थ्यांकडून तक्रार प्राप्त झाल्यानंतर एसीबीने सापळा लावला आणि तीन हजाराची लाच स्वीकारताना मुख्याध्यापकास रंगेहात पकडण्यात आले. या कारवाईने जिल्ह्यात खळबळ उडाली आहे. ही कारवाई बीड लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे पोलीस उपाधीक्षक शंकर शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक शेख युनूस, श्रीराम गिराम आदींनी केली आहे. याप्रकरणी पोलिसात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे. सातत्याने लाचखोरीच्या घटना उघडकीस येत असल्याने लाचखोरांचा जिल्हा अशी बीडची ओळख होऊ लागली आहे.

**अनुदानीत शाळेत कसल्याही प्रकारची फीस घेतली वा आकारली जात नाही परंतु स्वंय: अर्थसहाय्यत शाळेमध्ये सुविधानुसार फिस आकारणी केली जाते.**
**बेडसकर साहेब**
**शिक्षणाधिकारी केज**

# भारतीय बौद्ध महासभेचे जिल्हाधिकाऱ्यांना मनुस्मृति श्लोक शालेय पाठ्यपुस्तकात शिकवू नये या मागणीचे निवेदन

**प्रतिनिधि/बीड**


राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद महाराष्ट्र राज्य पुणे, यांनी तयार केलेला राज्य अभ्यासक्रम आराखडा (शालेय शिक्षण) 2024 मसुद्यावर प्रतिक्रिया नोंदविण्याबाबत केलेल्या आवाहनानुसार खालीलप्रमाणे हरकत या पत्राद्वारे नोंदविण्यात येत आहेत. इयत्ता तिसरी ते इयत्ता बारावीच्या अभ्यासक्रमामध्ये भगवद्गीता, मनाचे श्लोक आणि मनुस्मृति यांच्या विषमतावादी विचारांचा, धोरणांचा समावेश करणे या बाबी भारतीय संविधानाच्या मूलभूत अधिकार कलम 13,14,17,19, 21, 28 नुसार बेकायदेशीर व असंविधानिक असल्यामुळे त्या विरोधात तीव्र निषेध व्यक्त करण्यात येत असून व हरकती नोंदविण्यात येत आहे. आपल्या राज्य अभ्यासक्रम आराखड्यानुसार शालेय अभ्यासक्रमामध्ये मनाचे श्लोक, भगवद्गीता आणि मनुस्मृतीच्या काही अंशाचा समावेश करणे आक्षेपार्ह असून, धर्मनिरपेक्ष असलेल्या भारतातील सर्व नागरिकांस समान असलेल्या समता, स्वातंत्र्य, बंधुता आणि नैसर्गिक न्यायाच्या संकल्पनेला काळीमा फासणारी बाब आहे. तसेच सर्जनशील भारताची निर्मिती करणाऱ्या शिक्षण प्रणालीमध्ये अशा प्रकारच्या समता मुलक समाज निर्मितीच्या संविधानाच्या तत्त्वाला मूठमाती देणाऱ्या विषमता वादाचा पुरस्कार व त्याचे समर्थन करणाऱ्या अभ्यासक्रमाचा शालेय शिक्षणात समावेश करून गोर-गरीब भारतीय नागरिकांमध्ये भय आणि मानवी विषमता निर्माण होण्यास खतपाणी घालण्याचा प्रयत्न स्पष्ट होत आहे.

आपल्या देशाच्या धर्मनिरपेक्ष संविधानाने देशातील सर्व जाती धर्मांना संरक्षित करत, कलम 28 प्रमाणे आश्वस्त केले आहे की, कलम 28 (1) नुसार, पूर्णतः राज्याच्या निधीतून चालविल्या जाणाऱ्या कोणत्याही शैक्षणिक संस्थेत कोणतेही धार्मिक शिक्षण दिले जाणार नाही अशी तरतूद आहे, त्यामुळे सरकारकडून कोणत्याही धर्माच्या विचारसरणीच्या बाबी शिकविता येणार नाहीत. त्याचबरोबर भारतीय संविधानातील कलम 13 (1) नुसार, या संविधानाच्या प्रारंभाच्या लगतपूर्वी भारताच्या राज्यक्षेत्रात अंमलात असलेले सर्व कायदे, ते जेथवर या भागाच्या तरतुदींशी विसंगत असतील तेथवर, ते अशा विसंगतीच्या व्याप्तीपुरते शून्यवत आहे, 13 (2) नुसार राज्य या भागाने प्रदान केलेले हक्क हिरावून घेणारा किंवा त्यांचा संकोच करणारा कोणताही कायदा करणार नाही आणि या खंडाचे उल्लंघन करुन केलेला कोणताही कायदा, आदेश, नियम, विनिमय, सूचना, शिक्षण, प्रशिक्षण इत्यादी शून्यवत ठरविले आहेत. असे असताना उपरोक्त बाबी शालेय अभ्यासक्रमात समाविष्ट करण्याचा प्रयत्न करणे म्हणजे देशातील युवा वर्गाला अधोगतीच्या विषमतेच्या दिशेने पुन्हा घेऊन जाण्याचा प्रयत्न करत असल्याचे स्पष्ट होते आहे. वरील पार्श्वभूमीवर प्रस्तावित मसुदयामध्ये मनाचे श्लोक, भगवद्गीता आणि मनुस्मृतीच्या काही अंशाचा समावेश करणे भारतीय संविधानाच्या मूलभूत अधिकार 13,14,17,19,21,28 नुसार बेकायदेशीर व असंविधानिक असल्यामुळे त्या बाबी रद्द कराव्यात आणि संविधानाची प्रास्ताविका, अनुच्छेद 13 ते 32 पर्यंतचे मूलभूत अधिकार आणि भारतीय नागरिकांची मूलभूत कर्तव्यें या मूल्यांचा समावेश करावे की ज्यामुळे भारतीय नागरिक आपल्या हक्क आणि अधिकारासंबंधी आणि कर्तव्या संबंधी जागृत होतील. तेच देश हितकारक आहे. वरीलप्रमाणे दुरुस्ती न झाल्यास दि बुद्धिस्ट सोसायटी ऑफ इंडिया / समता सैनिक दल आणि संविधान समर्थक समाज, विविध संघटनांच्यावतीने महाराष्ट्रभरामध्ये तीव्र स्वरूपाचे पडसाद उमटतील आणि उग्र आंदोलन छेडण्यात येतील त्याची संपुर्ण जबाबदारी आपली असेल, याची गांभीर्यपूर्वक नोंद घ्यावी. याबाबत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नातू डॉ भीमराव य. आंबेडकर (ट्रस्टी / राष्ट्रीय कार्याध्यक्ष व समता सैनिक दलाचे राष्ट्रीय अध्यक्ष) व डॉ. हरीष रावलिया (ट्रस्टी चेअरमन), ॲड. सुभाष जौंजाळे (रिपोर्टिंग ट्रस्टी चेअरमन) यांच्या नेतृत्वाखालील शिष्ट मंडळाबरोबर चर्चा करण्यासाठी वेळ दयावी, ही विनंती यावेळी शिष्टमंडळात भारतीय बौद्ध महासभेचे बीड जिल्हा अध्यक्ष महालिंग निकाळजे,अमरसिंह ढाका, विश्वनाथ निसर्गन, शोभा साळवी, अरुणा निसर्गन,गौतम खेमाडे,केतन गायकवाड, गौतम कांबळे,संदेश डोळस,दिपक कांबळे,मिलिंद सरपते, सिद्धेश्वर बनसोडे, सदाशिव पट्टेकर आदी उपस्थित होते.

# कै रामभाऊ अण्णा खाडे अध्यापक विद्यालयात भावी गुरुजींची परीक्षा सुरळीत सुरु

**प्रतिनिधि /दिंद्रुड**

अंबाजोगाई शासकीय अध्यापक विद्यालया अंतर्गत आंबेजोगाई व माजलगाव तालुक्यातील अध्यापक विद्यालयाची भावी गुरुजींची परीक्षा दिंद्रुड येथील कै रामभाऊ अण्णा खाडे अध्यापक विद्यालय परीक्षा केंद्रावर सोनाजीराव प्राध्यापक विद्यालय माजलगाव, शकुंत हरीश अध्यापक विद्यालय केंद्रेवाडी, बाळासाहेब लहाने अध्यापक विद्यालय आंबेजोगाई ह्या अध्यापक विद्यालयातील भावी गुरुजींची परीक्षा दिनांक 6 जून 2024 ते 14 जून 2024 या कालावधीमध्ये चालू आहेत भावी गुरुजी म्हणून प्रथम वर्षाला 121 व द्वितीय वर्षाला 142 भावी गुरुजी परीक्षा देत आहेत. परीक्षा केंद्रावर केंद्रसंचालक म्हणून.



श्री महामुनी आर व्ही, पर्यवेक्षक म्हणून श्री कुरे आर ए,श्री.पोटभरे एल बी, श्रीमती कदम ए एच, श्री सिद्धीकी ए जी, श्री मोती एस एल, श्री पवार व्ही बी, श्री वैरागे व्ही टी, व कै रामभाऊ अण्णा खाडे सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष तथा नाथ शिक्षण संस्थेचे सहसचिव प्रदीप खाडे, कै रामभाऊ अण्णा खाडे अध्यापक विद्यालयाचे श्री विलासजी खाडे सर व अध्यापक विद्यालयाचे प्राचार्य व कर्मचारी परीक्षा केंद्रावर परीक्षा सुरळीत पार पडत आहेत. कै.रामभाऊ अण्णा खाडे सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष तथा नाथ शिक्षण संस्थेचे सहसचिव प्रदीप खाडे यांच्या मार्गदर्शनाखाली ग्रामीण भागातील विध्यार्थी यांची गैरसोय होऊ नये म्हणून दिंद्रुड येथील परीक्षा केंद्र मंजूर करून गेल्या १८ वर्षपासून याठिकाणीच्या परीक्षा केंद्रावर परीक्षा सुरळीत पार पडत आहेत.

## काळीज माझं साहित्य सामाजिक संस्थेद्वारे मा. समाधान दिनकर लोणकर यांना समाज भूषण पुरस्कार जाहीर

काळीज माझं साहित्य संस्था संभाजीनगर या सामाजिक संस्थेद्वारे आयोजित दुसरे राज्यस्तरीय काव्य संमेलन व पुरस्कार सोहळ्यामध्ये महाराष्ट्रातील विविध क्षेत्रात काम करणाऱ्या व्यक्तींना विविध राज्यस्तरीय पुरस्काराने सन्मानीत करण्यात येणार आहे.

या सामाजिक संस्थेद्वारे सामाजिक, शैक्षणिक, कला व साहित्य क्षेत्रात विशेष योगदानाबद्दल हिंगोली जिल्ह्यातील राहोली बु. या गावातील शाहीर दिनकर लोणकर यांचे सुपुत्र मा. समाधान दिनकर लोणकर यांना समाज भूषण पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. त्याबद्दल त्यांचे नातेवाईक, मित्रपरिवार व साहित्य क्षेत्रातील कवी, कवयित्री यांच्याकडून खूप कौतुक व अभिनंदन होत आहे. दि.09 जून 2024 रोजी जिजाऊ भवन, बाबा पेट्रोल पंप, छ.संभाजीनगर येथे होणाऱ्या राज्यस्तरीय काव्यसंमेलन व पुरस्कार सोहळ्यामध्ये मा. समाधान दिनकर लोणकर यांना समाज भूषण पुरस्कार उपस्थित मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात येणार आहे.

मा. समाधान लोणकर यांच्या विविध सामाजिक, शैक्षणिक, प्रेम, निसर्ग अशा विविध विषयांवरील प्रबोधनात्मक कविता, लेख हे दैनिक वृत्तपत्रे , साप्ताहिके यामधून प्रकाशित होत असतात.



# बजरंग बप्पा सोनवणे यांच्या विजयाचा पिपंळाधायगुडामध्ये जल्लोष

**प्रतिनिधि बीड**

बीड लोकसभा मतदारसंघातून राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार गटाचे अधिकृत उमेदवार बजरंग बप्पा सोनवणे यांचा विजय झाल्याबद्दल पिपंळा धायगुडा येथील असंख्य कार्यकर्त्यांनी तोफांची सलामी देऊन, पेढे वाटून, गुलाल उधळून सोनवणे यांच्या विजयाचा जल्लोष साजरा केला. अतिशय चुरशीची झालेली बीड लोकसभा निवडणूक निकालाकडे संपूर्ण राज्यासह देशाचे लक्षण लागून होते. त्यात शेवटी ६५८५ मतांनी महाविकास आघाडीचे उमेदवार बजरंग सोनवणे यांचा विजय घोषित होताच कार्यकर्त्यांनी मोठा जल्लोष साजरा केला. त्याप्रसंगी गांवातील प्रमुख बप्पा साठी दिवसाची रात्र आणि रात्री चा दिवस करना रे कुंडली अप्पा धायगुडे सुंदर धायगुडे प्रकाश शिंके मनोहर धायगुडे अरूण गरड यांच्यासह असंख्य कार्यकर्त्यांनी तोफांची सलामी देऊन पेढे वाटून गुलाल उधळून मोठा जल्लोष साजरा केला.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com